**Impact Factor – 7.139 ISSN – 2348-7143**

# Current Global Reviewer

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal
PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

**March 2020 Special Issue- 25 Vol. 3**

# The Current Issues in Social Sciences in India (CISSI-2020)

**Chief Editor**
**Mr. Arun B. Godam**

**Guest Editor**
**Principal Dr. V.G. Sanap**
**I/c Principal Prof. Dr. B.D. Kokate**

**Editor**
**Dr. R.K. Kale**

**Co-Editor**
**Dr. S.N. Akulwar**
**Dr. B.D. Jadhavar**
**Dr. S.E. Ghumatkar**

**Shaurya Publication, Latur**

103. प्रशासकीय सुधारणा आणि जागतिकीकरण 318
डॉ. रमेश वाघमारे

104. पंडिता रमाबाईंचे सामाजिक सुधारणा चळवळीतील योगदान 322
वायबसे बळीराम बप्पा

105. भारतातील बॅंकीग क्षेत्रातील सुधारणा 324
डॉ.एस.पी. झांबरे

106. शरद पाटलांची अब्राह्मणी लेखन पध्दती : एक चिकित्सा 327
प्रा. झांजे बी.जे.

107. A Paper on “Casteism” 330
Dr. Binay Kumar Singh

108. “ हवामान बदलाचा कृषीक्षेत्रावरील आर्थिक परिणाम एक अभ्यास : विशेष संदर्भ बीड जिल्हा ” 333
डॉ. ए. पी. राऊत , डॉ. एस. ई. घुमटकर

109. “ग्रामीण विकासात माहिती तंत्रज्ञानाची भूमिका : कृषी क्षेत्राचा विशेष अभ्यास” 340
डॉ. संतोष भिवसन काकडे

110. शासनातील नैतिकता : द्वितीय प्रशासकीय सुधारणा आयोग 343
हेळंबे हनमंत बालाजी, डॉ. शिंदे ज्ञानेश्वर साहेबराव

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Special Issue 25 , Vol. 3 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
March 2020 | SJIF | Impact Factor : 7.139

# शासनातील नैतिकता : द्वितीय प्रशासकीय सुधारणा आयोग

**हेळंबे हनमंत बालाजी**
लोकप्रशासन विभाग
र.भ. अट्टल महाविद्यालय, गेवराई

**डॉ. शिंदे ज्ञानेश्वर साहेबराव**
लोकप्रशासन विभाग
सुंदरराव सोळंके महाविद्यालय माजलगांव

---

**Abstract:**

शासनाचे सर्व अंग, व्यवस्था व प्रणाली भ्रष्टाचार मुक्त, सत्यनिष्ठेने आणि इमानदारीने कार्य करत असेल तर शासनामध्ये नैतिकतेची स्थापना अथवा सुशासनाची निर्मिती होते. नैतिकतेच्या अभावी भ्रष्टाचार, लाच देवान-घेवान, अनैतिक कृत्यांना चालना मिळते. भ्रष्टाचार संपूर्ण जगामध्ये व्याप्त असून तो गंभीर चिंतनाचा विषय बनलेला आहे. भारतासह अनेक राष्ट्रांनी आपल्या राष्ट्रातील भ्रष्टाचार निवारणासाठी अनेक कायदे, नियम व संस्था निर्माण केले आहेत. परंतु राजकीय, आर्थिक, सामाजिक क्षेत्रात भ्रष्टाचार मोठया प्रमाणात पहायला मिळतो. भ्रष्टाचारामुळे समृध्द सशक्त भारत निर्मिती प्रक्रियेत अडथळे येतात. यासाठी नैतिकतेला सर्व स्तरावर महत्व देणे आवश्यक आहे. नागरीक व्यवहारात ही नैतिकता महत्वपूर्ण आहे कारण नैतिक व्यवहाराचा सरकार, प्रशासनावर प्रत्यक्ष स्वरुपात प्रभाव पडतो. नैतिकता माणक नियमांचा एक संवर्ग आहे जे व्यक्तीच्या कार्य, व्यवहारात मार्गदर्शनामध्ये सहाय्यता करतो. ज्या परिवर्तनाची आपण अपेक्षा करतो ते स्वतःपासून करणे आवश्यक असते.

**Keywords :**

भ्रष्टाचार हा नैतिकतेच्या अपयशाचा महत्वपुर्ण अभिव्यक्ती आहे. भ्रष्टाचार आणि सत्तेचा दुरुपयोग मूल्य व चारित्र्याचा अभाव यामुळे मोठया प्रमाणात होतो. नैतिक मूल्य अवलंब करुन मान आचरण सुधारणे, विश्वसनीय, पारदर्शक सार्वजनिक व्यवहार यांच्या माध्यमातून ईमानदार शासन निर्माण करता येते. तसेच गैर अधिग्रहण, कराराच्या स्वरुपात सुधारित कारभार, नौकरशाही विलंब व भ्रष्टाचार कमी होण्यामुळे जीडीपी विकास दर लक्षणीय वाढू शकतो. चांगल्या शासनाचे (गुणवत्तेचे) महत्वपुर्ण मापदंड आवाज आणि जबाबदारी, राजकीय अस्थिरता आणि अहिंसा, प्रभावशाली शासन, नियामकीय वाजवीपणा, कायदयाचे राज्य व लाचेचा अभाव हे आहेत. यातील कायदयाचे राज्य व लाचे चा अभाव नैतिक शासनाच्या संदर्भात प्रत्यक्ष स्वरुपात महत्वपूर्ण आहेत. व्यक्तीने आपल्या सार्वजनिक व्यवहार, आचरणात नैतिक मूल्यांना प्राधान्य दिले पाहिजेत. द्वितीय प्रशासकीय सुधारणा आयोगाने आपल्या शासनातील नैतिकता (Ethics in Governance) या अहवालात महत्वपूर्ण विषयांवर शिफारशी केलेल्या आहेत. त्याचा आढावा घेण्याचा प्रयत्न आहे.

**उद्देश :**

१) सार्वजनिक जीवनाचे नैतिक सिध्दांताचा अभ्यास करणे.

२) सुधारणा आयोगाने आपल्या अहवालात शिफारशी केलेल्या महत्वपूर्ण घटकांचा आढावा घेणे.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत शोधनिबंध तयार करण्यासाठी विश्लेषणात्मक व वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा अवलंब करण्यात आला आहे. तसेच तथ्य संकलन द्वितीयक साधन सामग्रीचा उपयोग्य केला आहे. तसे शासकीय अहवाल, संदर्भ ग्रंथ, मासिके इ.

**नैतिकता :**

शासनामध्ये नैतिकता यात शासन आणि नैतिकता दोन स्वतंत्र संकल्पना आहेत. सर्वसाधारणपणे 'शासन म्हणजे निर्णय घेण्याची प्रक्रिया आणि प्रक्रियेद्वारे निर्णय कार्यान्वित केले जातात.' नैतिकता म्हणजे नैतिक आचारसंहिता म्हणजेच कार्यपध्दती विषयीची संहिता होय. भ्रष्टाचारामुळेआर्थिक विकास कमी होतो, गरिबांचे शोषण होते. जे राष्ट्रीय प्रगतीत मोठा अडथळा ठरते. भ्रष्टाचार हा कॅन्सर रुपी रोग असून तो पूर्णतः व्यवस्थाच मृतप्राय बनवतो. भ्रष्टाचारामुळे शासन व सामाजिक स्थिती पूर्णतः विकृत बनते. त्यासाठी भ्रष्टाचार समाप्त करुन चांगली व्यवस्था निर्माण करणे, संतुलित विकासाला प्राधान्य देणे महत्वपूर्ण आहे. यातून सुशासनाची निर्मिती होते. सुशासनामध्ये लोकशाही विकेंद्रीकरण, सहभागीत्व पारदर्शकता जबाबदारी या तत्वाबरोबरच नैतिक शासनव्यवस्थेत नैतिकतेच्या स्वरुपाविषयी अध्ययन करताना राजकीय व्यवस्था आणि नैतिक मूल्य या चर्चेला प्रथम सुरुवात केली पाहिजे. राजकीय व्यक्ती / पदाधिकारी विधिमंडळ व कार्यकारी मंडळामध्ये महत्वपूर्ण भूमिका पार पडतात. परंतु राजकारणात नैतिकतेच्या दृष्टीने दोषयुक्त वातावरणात ही अपेक्षा करणे अवास्तव ठरते. कारण नैतिकतचे उच्च मानदंड भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील अतुट भाग होते. परंतु स्वातंत्र्यानंतर नैतिकतेचा हा वृक्ष तुटताना पाहावयास मिळतो आहे. जसे निवडणुकीत गैरमार्गाचा अवलंब, सत्तेचे केंद्रीकरण, राजकीय गुन्हेगारी, जनहितापेक्षा स्वहिताला महत्व, भ्रष्टाचार, सार्वजनिक पदाचा दुरुपयोग हे राजकीय प्रक्रियेचे दुःख(वेदना) बनले आहे. आयोगाने आपल्या अहवालात नैतिकतेचे स्वरुपांतर्गत नैतिकता आणि राजकारण, सार्वजनिक जीवनात नैतिकता, नैतिकतेसंबंधी आंतरराष्ट्रीय दृष्टीकोन, मंत्र्यांसाठी नैतिकता, कायदे निर्माण कर्त्यासाठी नैतिकता, नागरी सेवक व न्यायपालिका आणि नैतिकतां यासंदर्भात अभ्यासपूर्ण शिफारशी केल्या आहेत.

आयोगाने आपल्या अहवालात निवडणूक खर्चासाठी राजकोष व्यवस्था लागू करणे, पक्षांतर बंदी कायदा प्रभावी करुन सदस्यत्व रद्द करणे. मंत्र्यांना वर्तमान आचारसंहिते बरोबरच नैतिक आचारसंहिता कर्तव्य निष्पादन साठी संवैधानिक व नैतिक मानदंड बनवणे व त्यांचे

पालनाला प्राधान्य दिले. पंतप्रधान व मुख्यमंत्री कार्यालयामध्ये नैतिक संहिता व आचारसंहिता पालन होते का हे अवलोकन करण्यासाठी एक यंत्रणा स्थापन करावी. संसदेच्या प्रत्येक सदनात नैतिकता आयुक्त पद निर्माण करावे. याशिवाय सेवकांची नैतिक मूल्य व नैतिक संहिता महत्वपूर्ण मानलेली आहे. न्यायपालिकेसाठी ही नैतिकतेची संरचना करताना एक न्यायीक परिषद स्थापन करावी त्यात उपराष्ट्रपती अध्यक्ष पंतप्रधान, लोकसभा अध्यक्ष, सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधिश, कायदामंत्री, विरोधी पक्षनेते लोकसभा व राज्यसभा यांचा समावेश असावा.

**सार्वजनिक जीवनाचे नैतिक सिध्दांत**

नैतिकतेची उणीव उत्तरदायीत्व आणि जबाबदारी धारण करण्यामध्ये दिसते. लोकशाहीमध्ये सार्वजनिक पद धारण करणारा शेवटी जनतेला जबाबदार असतो. ही जबाबदारी कायदे व नियमाच्या व्यवस्थेतून अधिक प्रभावीत करता येते. तसेच नैतिकता कायदे, नियमांच्या निर्मितीला आधार देते. लोकशाही मध्ये सार्वजनिक पद धारण करणाऱ्या व्यक्तींसाठी नैतिकतेचे मानदंड निश्चितीसाठी नोलन समिती नियुक्ती केली होती. त्या समितीने सार्वजनिक जीवनाचे सात नैतिक सिध्दांत सांगितले आहेत.

१. **निःस्वार्थनिष्ठा (Selflessness)**

सार्वजनिक पद धारण करणाऱ्या व्यक्तीने स्वतःचे परिवार, मित्र यांना आर्थिक व भौतिक लाभ प्राप्त करण्यासाठी निर्णय न घेता जनहित संबंधित निर्णय स्वतः घेतले पाहिजेत.

२. **सत्यनिष्ठा (Integrity)**

सार्वजनिक पदावरील व्यक्तीने बाहेरील व्यक्ती अथवा संघटना सोबत वित्तीय किंवा इतर प्रभावाला बळी पडू नये कारण त्यांचा कार्य निष्पादनावर प्रभाव पडू शकतो.

३. **विषयनिष्ठा (Objectivity)**

सरकारी काम करताना अनेक कार्य करावे लागतात. जसे सार्वजनिक नियुक्त्या करणे, निविदा स्विकारणे, व्यक्तींना पुरस्कार अथवा लाभासाठी शिफारस करणे इ. चा समावेश होतो. असे कार्य करताना निवड योग्यतेच्या आधारावर केली पाहिजेत.

४. **उत्तरदायित्व (Accountability)**

सरकारी पद धारण केलेल्या व्यक्तीने आपल्या निर्णय व कार्याप्रती उत्तरदायी असले पाहिजेत.

५. **खुलेपणा (Openess)**

सरकारी पद धारण केलेल्या व्यक्तीने आपल्या सर्व निर्णय व करावया संबंधित खुलेपणा पाळला पाहिजे. त्यासाठी त्यांनी निर्णयांचे कारणांचा उल्लेख केला पाहिजेत. व्यापक स्वरुपात जनतेच्या ईच्छा, अपेक्षांना प्राधान्य दिले जावे.

६. **ईमानदारी (Honesty)**

सरकारी पद प्राप्त व्यक्तीने आपल्या कर्तव्य व कामाप्रती ईमानदार असावे. कामकाजातील विरोधाचे समाधान योग्य करुन जनहिताचे रक्षण करावे.

७. **नेतृत्व (Leadership)**

सरकारी पदाधिकाऱ्यांनी आपल्या नेतृत्वाद्वारे तत्व, सिध्दांत विकसित करुन समर्थन केले पाहिजेत.

प्रत्येक शासनामध्ये सार्वजनिक जीवनाचे हे सिध्दांत सामान्य व्यवहाराचे सिध्दांत असून त्याचे पालन होणे आवश्यक आहे. केवळ व्यक्ती नैतिक असून चालत नाही तर नैतिक मूल्य व्यवहारात उपयोगी आणले पाहिजे.

**व्यापक सुधारणा**

शासनामध्ये नैतिकता वृध्दी, पारदर्शकता, सेवेची गुणवत्ता सुधारण्याच्या दृष्टीने व भ्रष्टाचार निवारण व्हावे हा उद्देश समोर ठेवून व्यापक सुधारणेला महत्व दिले आहे. त्या सुधारणा पुढीलप्रमाणे आहेत.

१. सार्वजनिक सेवेच्या एकाधिकारशाही प्रतिस्पर्धा विकसित करणे.
२. माहिती तंत्रज्ञान साधनांचा वापर करणे. ही ई-प्रशासनाच्या माध्यमातून बंद करणे.
३. पारदर्शकतेला प्रोत्साहन देणे. पारदर्शकता ही जबाबदारी च्या दृष्टीकोनातून निश्चित करणे.
४. सत्य निष्ठेला प्राधान्य देणे त्यातून पारदर्शकता वृध्दी आणि जनतेसोबत विश्वासनियता निर्माण करणे.
५. पर्यवेक्षणाला प्राधान्य दिले जावे, क्लब व उत्तरदायित्व निश्चित करणे.
६. तक्रार निवारण प्रभावीपणे करणे.
७. नागरी सेवेमध्ये सुधारणा घडवून आणणे.

लेखापरिक्षण, माहितीचे एकत्रीकरण, वित्तीय सेवा देवानघेवाण संदर्भात पारदर्शकता इ. ला आयोगाने महत्वपूर्ण मानले आहे. शासन-प्रशासनामध्ये नैतिकता, प्रामाणिकता, पारदर्शकता हे उच्च प्रमाणके आचरणात आणून समावेशक व न्याय विकास करता येईल.

**संदर्भ :**

१. भारत सरकार, द्वितीय प्रशासकीय सुधारणा आयोग, शासन में नैतिकता (चौथा अहवाल) जानेवारी २००७ पृ. १७३-१७७.

२. उपरोक्त अहवाल पृ. १९-२०.

३. Arora Ramesh, (२०१०) Ethics in Governance, Rawat Publisher & Distributors Delhi.

४. इ. श्रीधरन, वख्लू भरत (संपादित-२०१७) मूल्यांचे पुनरुज्जीवन, SAGE Bhasha, New Delhi.